साप्ताहिक
# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २२ जुलै २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.




परळी वैजनाथ :- शहरात ठिकठिकाणी वाहतुकीची सतत कोंडी होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे. याकडे मात्र कुणाचेही लक्ष नाही. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे आहे ते पोलिस, पालिका प्रशासन काय करते? असा सवाल संतप्त नागरिक व्यक्त करत आहेत. परळी शहरातील घरणीकर मार्गावर वाहतुकीची सतत कोंडी होत आहे. यामुळे परिसरातील व्यापारी, रहिवाशी व या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. या वाहतुक कोंडीचे हे बोलके छायाचित्र....

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी ना.धनंजय मुंडे यांची निवड

बीड (बातमीदार):- लोकसभा निवडणुकीच्या निकालामध्ये महाराष्ट्रात महायुतीला मोठा धक्का बसला तर दुसरीकडे महाविकास आघाडीनं मात्र जोरदार मुसंडी मारल्याचं पाहायला मिळालं. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षेपेक्षा अधिक जागा मिळाल्या. आता विधानसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांना विधानसभेचे वेध लागले असून, मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादीच्या गोटातून मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्री धनंजय मुंडेंवर आता आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांची पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी निवड होताच बीडच्या परळी शहरात कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला आहे. कार्यकर्त्यांनी लक्ष्मीबाई टॉव परिसरात एकत्रित येत फटाक्यांची आतिषबाजी करत धनंजय मुंडे यांच्या निवडीचे स्वागत करत आनंद व्यक्त केला आहे. यावेळी धनंजय मुंडे यांच्या समर्थनार्थ



कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी देखील केली. दरम्यान धनंजय मुंडे हे सुरुवातीपासून अजित पवार यांच्यासोबत आहेत. अजित पवार यांच्या उठावानंतर राष्ट्रवादीत मोठी फूट पडली. राष्ट्रवादीत दोन गट पडले एक राष्ट्रवादी अजित पवार गट तर दुसरा राष्ट्रवादी शरद पवार गट, या सर्व घडामोडींमध्ये धनंजय मुंडे यांनी सुरुवातीपासून अजित पवार यांना साथ दिली. भाजपला पाठिंबा जाहीर करताना अजित पवार यांच्यासोबत सुरुवातीला राष्ट्रवादीच्या ज्या नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली त्यामध्ये धनंजय मुंडे यांचा देखील समावेश होता. दरम्यान त्यांना आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदाची देखील जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, या निवडीबद्दल परळीत कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून, पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. ***

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत प्रत्येक बहिणीचे नाव येण्यासाठी अंगणवाडी सेविका सहकार्य करणार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार साहेब,कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब व माजी मंत्री आ. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिनांक १५ जुलै ते २६ जुलै दरम्यान परळीचे माजी नगराध्यक्ष व गटनेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळीच्या वतीने परळी शहरात ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे'' प्रभागनिहाय नोंदणी कॅम्प सुरु झाले असून या शिबिरातून जास्तीत जास्त बहीणींनी नोंदणी करावी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रत्येक बहिणीला दरमहा १५००/- रुपये सन्मान निधी सुरु करुन द्यावा ही नम्र विनंती.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे ना.धनंजय मुंडे साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी शहरातील सर्व अंगणवाडी सेविकांना निमंत्रित करण्यात आले होते,यावेळी अंगणवाडी सेविकांनी

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रभागनिहाय नोंदणी सुरू



शहरातील सर्व शिबीरांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचन याप्रसंगी दिले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी परळी शहराचा प्रत्येक पदाधिकारी,बुथ समिती, विविध आघाडी सदस्य हे प्रत्येक बहिणीची नोंदणी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत करण्यासाठी कटिबद्ध असून सर्व प्रभागात एकूण २७ शिबिरात राष्ट्रवादीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. शुभारंभ प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी रामेश्वर मुंडे, माजी उपनगराध्यक्ष अय्युब पठाण, रविंद्र परदेशी, नगरसेवक अजिझ कच्छी, हाजी बाबा, रवी मुळे, अनंत इंगळे,पंडित झिंजुर्डे, महेंद्र रोडे, शंकर कापसे, सचिन मराठे, लाला खान पठाण, सुरेश नानावटे, मोईन काकर, दिपक कुरील, चंद्रप्रकाश हालगे, राजु भाई, निलेश सगट, अनंत ढोपरे, ऋषिकेश राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ***

## परळी पालिकेतील कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम तात्काळ द्या

परळी वैजनाथ, (बातमीदार):- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त नगर परिषद कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम तात्काळ देण्याची नगर परिषदेचे मुख्यधिकारी यांच्याकडे राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाची निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्याकरिता न.प कर्मचाऱ्यांना थकित महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम व दहा हजार रुपये ॲग्रीम सन प्रत्येक कर्मचाऱ्यास देण्यात यावा अशा स्वरूपाचा निवेदन राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या वतीने नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी यांना संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. दिलेल्या निवेदनाची तात्काळ दखल घ्यावी अन्यथा अंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या शाखा अध्यक्ष प्रशांत जगतकर, राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे महासचिव विशाल बनसोडे व पदाधिकारी यांनी दिला आहे. ***

सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

# पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते परळीत सीसीटीव्ही यंत्रणेचे उद्घाटन

परळी (बातमीदार):- शहरावर अत्यंत प्रगत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचं निगराणी असणार आहे. जसा शंकराचा तिसरा डोळा आहे. तो कोणाला कधी दिसला असेल नसेल परंतु पोलिसांचा तिसरा डोळा मात्र आज पासून परळी शहरात ३५ ठिकाणी १३३ सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून पूर्णपणे दिसणार आहे. यामुळे आणि शहरातील गुन्हेगारीला चाप बसणार असून अनेकांना गुन्ह्यात तपासासाठी विनाकारण त्रास सहन करावा लागत होता. परंतु आता सीसीटीव्ही कॅमेरे सर्वत्र बसवल्याने खरा गुन्हेगार शोधण्यासाठी ही प्रणाली फार उपयुक्त ठरणार आहे. कुणीही काही केलं तरी सुटू शकणार नाही. नागरिकांनीही आपले कर्तव्य पार पाडावीत असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. शनिवारी बीड जिल्ह्यात परळी, माजलगाव व बीड पोलीस ठाणे अंतर्गत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. परळी येथील कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी



अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपाधीक्षक अनिल चोरमले, परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, नायब तहसीलदार बी एल रुपनर, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे सपोनि जाधव आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यािप्रसंगी उद्घाटन बोलताना कृषिमंत्री म्हणाले की परळी शहर हे तीन शक्तींचे केंद्र असून ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र , अधिक उत्पन्न देणारे दक्षिण मध्य रेल्वेचे परळी रेल्वे स्थानक आणि ज्योतिर्लिंग वैद्यनाथ यामुळे या शहरात भाविक भक्तांचे मोठा राबता असतो. शहरात येणारे भाविक त्यांचे वाहन आणि त्यांच्या जखमेच्या वस्तूची निगराणी यासोबतच शहरातील गुन्हेगारी वृत्तीवर या नवीन यंत्रणेतून पोलिसांना नियंत्रण मिळवणे शक्य होईल. नागरिकांनीही या नवनवीन उपलब्ध होणाऱ्या सोयी बरोबरच आपल्या कर्तव्याची ही जाणीव ठेवावी आणि वाहने पार करताना रस्त्यावर थुंकताना याचा विचार करावा की आता आपण कॅमेऱ्याच्या नजरेत आहोत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबाजोगाई विभागाच्या अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी तर मनोगत जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर केले. या कार्यक्रमास परळी शहर पोलीस ठाणे, संभाजीनगर पोलीस ठाणे, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधव उपस्थित होते. सीसीटीव्ही यंत्रणेवर ३ कोटी ५० लक्ष रुपयाचा खर्च करण्यात आला आहे. शहरातील चौकाचौकात सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली आहे. १३३ कॅमेरे असून यात वाहनाची नंबर प्लेट डिटेक्ट करण्याची ही सुविधा आहे. आपत्कालीन स्थितीत शहरात काही अनुचित प्रकार घडले तर याचा तपास कामात मोठा फायदा पोलीस यंत्रणेला होणार आहे.

दरम्यान मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात झालेली जाळपोळ, अनेक नेत्याच्या घरावरील हल्ले किंवा वाढती गुन्हेगारी, वाहन चोरी या पार्श्वभूमीवर मराठवाड्याचे आय. जी. डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी परळीतील पत्रकारांशी संवाद साधला होता. शहरातील ज्येष्ठ पत्रकारांनी बंद पडलेली सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी अशी मागणी बैठकीत केली होती. त्यांनीही यावर तात्काळ कारवाई करून सीसीटीव्ही यंत्रणा सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या. गुन्हेगारीवर वॉच ठेवण्यासाठी पोलिसांचा तिसरा डोळा समजला जाणारा सीसीटीव्ही कॅमेऱ्याही आता 'विघ्नहर्ता' ठरू शकतो. जसा शंकराचा तिसरा डोळा आहे. तसाच आता पोलिसांचाही परळी शहरावर १३३ सीसीटीव्ही कॅमेराच्या माध्यमातून तिसरा डोळा असणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, नाथ चित्रमंदिर रस्ता, बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसर, इटके कॉर्नर चौक, राणी लक्ष्मीबाई टावर चौक, मोंढा मार्केट, मौलाना अब्दुल कलाम आझाद चौक, महात्मा बसवेश्वर चौक, वैद्यनाथ मंदिर परिसर आदीसह परळी शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या रस्त्यावरही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

सीसीटीव्ही कॅमेरांच्या बाबतीत गुन्हे रोखणे हा प्रमुख उद्देश पोलिस प्रशासनाने डोळ्यासमोर ठेवला आहे. वाहतूक यंत्रणा सुरळीत ठेवणे, छेडखानी, मोर्चे, आंदोलन यावेळी कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणारे आंदोलक, चेन स्नॅचिंग, चोरी, हाणामारी, बेदरकारपणे वाहन चालवणे या घटनांवर कॅमेरांची विशेष नजर राहणार आहे. यामुळे गुन्हेगारीला नक्कीच आळा बसणार आहे. ***

# परळी औष्णिक विद्युत केंद्र प्रदुषणाची उच्च न्यायालयाकडून गंभीर दखल

## रिटला जनहितार्थ याचिका ठरवत महाजनको व प्रदुषण मंडळाला बजावली नोटीस

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीड जिल्ह्यातील परळी औष्णिक वीज प्रकल्पामुळे होत असलेल्या गंभीर प्रदूषणाविरोधात वडगाव दादहरी ग्रामपंचायतीच्या सरपंचाने दाखल केलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी करताना या रिटचा जनहितार्थ निर्णय घेतला आहे. याचिकेचे जनहितार्थ रुपांतर करत १३ ऑगस्ट पर्यंत बाजू मांडण्याविषयी महाजनको व प्रदूषण नियंत्रण मंडळाला नोटिस जारी केल्या आहेत.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांचा समावेश असलेल्या हायकोर्टाच्या खंडपीठाने परळी वैजनाथ औष्णिक प्रकल्पातून वर्षानुवर्षे निघणाऱ्या फ्लाय ॲश तसेच स्लरीमुळे आजूबाजूच्या शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर नापीक जमिनीत रूपांतर होत असल्याची गंभीर दखल घेतली आहे. पशुधन तसेच मानवी जीवनावर थेट परिणाम होत असल्याचे म्हणत उच्च न्यायालयाने राज्य सरकार, महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (महाजनको), आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांना नोटीस बजावली.

परळी तालुक्यातील वडगाव दादहरी येथील सरपंच अश्विनी कुक्कर यांनी वकील प्रशांत बर्डे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट दाखल करून औष्णिक वीज केंद्रातून निघणाऱ्या फ्लाय ॲश आणि स्लरीमुळे होणाऱ्या प्रदूषणावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

कुकर यांनी असा दावा केला की, कोळसा हे संयंत्र चालवण्यासाठी वापरले जाणारे प्राथमिक इंधन असल्याने, त्याचे अवशेष सुमारे ३ चौ.कि.मी.च्या परिसरात खुलेआम रचले जातात, ज्यामुळे अनेक किलोमीटरच्या परिघात पर्यावरणीय समस्या निर्माण होतात.

ॲड.बर्डे यांनी सांगितले की, महाजनको आणि थर्मल प्लांट व्यवस्थापन पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नसल्याचा ग्रामपंचायतीचा मुख्य युक्तिवाद आहे. प्रदूषणामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याच्या समस्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. आजूबाजूचा परिसर आणि शेतीवरही गंभीर परिणाम झाला आहे, जमिनी आधीच नापीक झाल्या आहेत.माणसं आणि पशुधन सारखेच समस्यांना तोंड देत आहेत. फ्लाय ॲशच्या सततच्या वाहतुकीमुळे गावातील रस्त्याचीही दुरवस्था झाली आहे. वीज गरजेची आहेच पण प्रदूषणावर नियंत्रण मिळवणेही गरजेचे आहे. दुर्दैवाने, प्लांट चालवणाऱ्या महाजेनकोने हे केले नाही असे ॲड. बर्डे म्हणाले. याचिकेत असेही निदर्शनास आणले आहे की, ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींमुळे, प्रदुषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) या समस्येची दखल घेतली परंतु आजपर्यंत कोणतेही प्रतिबंधात्मक किंवा उपचारात्मक उपाय सुरू करण्यात आलेले नाहीत.

याची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत नोटीस जारी केल्या आहेत. हायकोर्टाच्या विभागीय खंडपीठाने नोटीस जारी करताना, विशेषत: राज्य सरकार, एमपीसीबी आणि महाजेनको यांना या समस्येचे निराकरण करण्यासाठी उचललेल्या पावलांवर विशिष्ट उत्तरे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. सुनावणी दरम्यान राज्य सरकारतर्फे सरकारी वकील अमरजीत गिरासे, एमपीसीबीतर्फे उत्तम बोंदर आणि महाजेनकोतर्फे राहुल तांबे यांनी काम पाहिले. ***

# परळी पालिकेच्या वतीने शहरातील विविध भागात डास प्रतिबंधक औषधाची फवारणी सुरू

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी, शहरामध्ये पावसाळ्याच्या दिवसांत डेंग्यू तापावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नगर परिषद परळीच्या वतीने शहरातील विविध भागात डास प्रतिबंधक औषधाची फवारणी करण्यात येत आहे.



परळी वैजनाथ नगर परिषदच्या वतीने साथरोग प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी डास निर्मुलन मोहीम अंतर्गत डासांचा प्रादुर्भाव होऊ नाही म्हणून उपाय योजना नगर परिषद मार्फत करण्यात येत आहेत. नगर परिषदच्या वतीने खबरदारी म्हणून उपाय योजना स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येत आहेत शहराला स्वच्छ ठेवणे व डेंगू आजारापासून नागरिकांनी कोणते उपाय करावे काय, काळजी घ्यावी या करिता घरोघरी जाऊन उदा,पाणी टाकी , किंवा पाणी साठवण करण्याच्या सर्व प्रकारच्या जागी अबेटिंग टाकण्यात येत, आहे जेणेकरून त्या पाण्याच्या पृष्ठभागावर डेंगू सारखे मच्छर, होऊ नाही म्हणून याची माहिती सुद्धा देण्यात येत आहे त्याच प्रमाणे पूर्ण परळी शहरात प्रत्येक घरात जाऊन फवारणी करण्यात येत आहे शहराच्या मुख्य रस्त्यावर फॉगिंग मशीनद्वारे धूर करून फवारणी करण्यात येत आहे. जेणेकरून बाहेर रस्त्यावर सुद्धा स्वच्छ वातावरण राहावे मछर होऊ नाहीत यापुढे जनजागृती म्हणून शहरात प्रचार करण्यात येत आहे अश्या अनेक नागरिकांच्या आरोग्याचा विषय असल्या कारणाने ही मोहीम नगर परिषद घेत असून या मोहिमे साठी विशेष पथक म्हणून कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून संपूर्ण शहरात ही मोहिम जनजागृती घराघरात पोहचवी असा नगर परिषदचा हेतू असून नगर परिषद मार्फत तर सर्व उपाय योजना राबविण्यात येत आहेत परंतु नागरिकांना ही आपली कुटूंबाची काळजी म्हणून नगर परिषद द्वारे सांगण्यात अलेल्या आव्हानाला प्रतिसाद द्यावा जेणेकरून आपले परळी शहर अश्या आजारापासून दूर राहील अशी दक्षता घ्यावी असे आवाहन नगर परिषदने केले आहे त्याच बरोबर नागरिकांनी आपल्या परीसरात स्वच्छता राखा कचरा नगर परिषदच्या घटा गाडीतच टाका ,पाणी स्वच्छ ठिकाणी साठा करावा, सर्व कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आव्हान नगर परिषदचे प्रशासक तथा मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, उपमुख्याधिकारी संतोष रोडे, स्वछत विभागचे शंकर साळवे, विकास बनसोडे आदीनी केले आहे. **

# दिव्य जागृती संस्थानच्या वतीने परळीत मंगळवारी गुरूपोर्णिमा महोत्सव

परळी वैजनाथ, (बातमीदार):- दिव्य जागृती संस्थानच्या वतीने मंगळवार दिनांक २३ जुलै रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परळीत दिव्य ज्योती जागृती संस्थानची गुरूपौर्णिमेची २५ वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिरजवळ असलेल्या हालगे गार्डन येथे जय्यत तयारी करण्यात येत आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातून ५ हजार भाविक येणार आहेत. दिव्य जागृती संस्थानच्या वतीने दरवर्षी गुरूपौर्णिमेचा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. त्यानुसार यंदा उद्या २३ जुलै रोजी सकाळपासून विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ९ वाजता भारतीय संस्कृती नुसार वेद मंत्राचे उच्चारण होणार आहे. सकाळी १० वाजता गुरू महाराजांची आरती होईल. १०.३० वाजता सत्संग प्रवचन, भजन होणार आहे. दिल्ली येथील गुरु महाराजांच्या शिष्यांचे यावेळी प्रवचन होणार आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रमाची जय्यत तयारी केली जात आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त गुरू महाराजांच्या आरतीसह, प्रवचन होणार असल्याने भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. गुरुंचे स्थान प्रत्येक भक्त गणांच्या मनात अढळ आहे. गुरूने दाखवलेल्या मार्गाने चालून जीवनाचा उद्धार करून घेण्याचा प्रत्येकाचा संकल्प असतो. त्याच संकल्पानुसार गुरू प्रती असलेली निष्ठा, प्रेम व्यक्त करण्यासाठी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो. त्यामुळे बीड जिल्ह्यातील अधिकाधिक गुरू महाराजांच्या भक्तगणांनी गुरू पौर्णिमा उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन दिव्य जागृती संस्थान परिवाराने केले आहे. बीड जिल्ह्यात गुरू महाराजांचे भक्तगण मोठ्या प्रमाणात आहेत. या शिष्यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून गुरु पौर्णिमेचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार आहे. दिव्य ज्योति जागृती संस्थानच्या परळी शाखेच्या वतीने गुरू महाराजांचे कार्यक्रम घेतले जातात. गुरु-भक्तांची मोठी परंपरा राहिली आहे. दरम्यान, हालगे गार्डन, परळी वैजनाथ होणाऱ्या गुरु पौर्णिमा उत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्यामध्ये डेकोरेशन, सत्संगाच्या ठिकाणी महिला, पुरुष भक्तांना बसण्यासाठी कक्ष उभारणी, भजन, प्रवचनासाठी स्टेज उभारणी, महाप्रसाद वाटप कक्ष अशी तयारी करण्यात येत आहे. दरवेळीच्या तुलनेत यंदा भक्तगण अधिक संख्येने येणार आहेत. ***

संपादकीय...

# खरिपाची पिके बहरली...!

**-० सुविचार ०-**

आपल्या जन्मदात्यांबद्दल नेहमी कृतज्ञ रहा. कारण, त्यांनी त्यांच्याजवळ जे आहे त्यापेक्षा कितीतरी जास्तीचे आपल्या दिलेले आहे, याची खात्री बाळगा.

२०१५ च्या तीव्र दुष्काळापेक्षाही गेल्या वर्षी आपल्याकडे कमी पाऊस झाला होता. त्यामुळे परळी व परिसरातील नागरिकांना गेल्या वर्षभरात मोठ्या पाणी टंचाईचा सामना करावा लागला. यामुळे नागरिकांचे मोठे हाल झाले. शेती उत्पादनावरही याचा मोठा परिणाम झाला. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला. या दुष्काळाच्या झळा सर्वांनाच कमी जास्त प्रमाणात सोसाव्या लागल्या.

गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात आपल्याकडे वार्षिक सरासरीच्या निम्माही पाऊस झाला नाही. केवळ तीनशे सत्तर मिलीमीटर पाऊस गेल्या पावसाळ्यात झाला होता. यामुळे नदी, नाले कोरडेच होते. भूगर्भात पुरेसा जलसाठा झाला नाही. परिणामी विहिरींनी तळ गाठला. कित्येक विहिरी कोरड्या पडल्या. बोर आटले. छोटे-मोठे तलावही कोरडेठाक झाले. नागापूर, कन्हेरवाडी येथील तलावांचा अपवाद वगळता परळी तालुक्यातील व परिसरातील बहुतेक लघु, मध्यम प्रकल्प कोरडेच होते. नागापूर येथील 'वाण' मध्यम प्रकल्पात उपलब्ध असलेल्या पाण्याने परळीकरांची तहान भागवली. इतर ठिकाणी मात्र सर्वांचीच गैरसोय झाली. 'अलनिनो'चा परिणाम गेल्या वर्षीच्या पावसावर झाल्याचे आपल्याकडे हवामान अभ्यासक सांगत राहिले.

यंदा अलनिनो ची तीव्रता ओसरल्याने पाऊसकाळ चांगला राहिल असा अंदाज हवामान अभ्यासक, संस्थांनी जाहीर केला होता. यामुळे सर्वांचीच मोठी काळजी दूर झाली होती. मे महिन्यातच आपल्याकडे अवकाळी पाऊस मधून मधून बरसू लागला. यामुळे यंदा मे च्या उन्हाळ्याचे चटके अनेक दिवस कमी जाणवले. जून महिन्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर सुरूवातीपासूनच आपल्याकडे पाऊस बरसतो आहे. तीस जून पर्यंत आपल्याकडे दीडशे मिलिमीटर पेक्षाही जास्त पाऊस झाला. यामुळे अनेक शेतकऱ्यांनी जूनच्या शेवटपर्यंत व उर्वरित शेतकऱ्यांनी जुलैच्या प्रारंभी खरिपाच्या पेरण्या उरकल्या. अनेक शेतकऱ्यांनी तर मृगनक्षत्रातच पेरणी केली. मृगनक्षत्रात झालेल्या पावसामुळे या पेरण्या होऊ शकल्या. मृगनक्षत्रात आपल्याकडे खरिपाच्या पेरण्या होण्याची गेल्या अनेक वर्षातील ही पहिलीच वेळ होती.

कापूस, तूर, सोयाबीन, तीळ, मूग, पिवळी ज्वारी आदी पिकांचा पेरा शेतकऱ्यांनी केला आहे. तीळ, मूगाची पेरणी वेळेवर झाल्याने चांगले उत्पादन मिळेल ही आशा शेतकऱ्यांना आहे. जूनच्या सुरूवातीपासूनच आपल्याकडे पावसाच्या सरी बरसत आहेत. यामुळे गरजेपुरता पाऊस होत असल्याने अधून मधून पडणाऱ्या उन्हामुळे खरिपाच्या पिकांची चांगली वाढ होत आहे. यामुळे यंदा खरिपाची पिके चांगली बहरली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. यंदा सुगी चांगली येईल असे सर्वांनाच वाटते आहे. दरम्यान, यंदाचा पावसाळा सुरू होऊन दीड महिन्यापेक्षा जास्त काळ लोटला आहे. नदी-नाले भरभरून वाहतील, प्रकल्पात पाणीसाठा होईल असा मोठा आणि दमदार पाऊस आपल्याकडे अद्याप झाला नाही. तालुक्यात जलसाठ्यात वाढ होण्यासाठी मोठ्या पावसाची आवश्यकता आहे. यंदाच्या पावसाळ्यात रविवार (ता.२१) मध्यरात्रीपर्यंत परळी तालुक्यात सुमारे ३५० मिलिमीटर पाऊस झाला आहे. बीड जिल्ह्याच्या इतर तालुक्याच्या तुलनेत आपल्याकडे झालेला पाऊस समाधानकारक आहे. जलसाठ्यात वाढ होण्यासाठी मोठे पाऊस हवे आहत. पुढील काळात पावसाची मोठी नक्षत्रे आहेत. धो-धो पाऊस होईल असा अंदाजही आहे. त्यामुळे तळे भरतील, नद्या वाहतील असे अंदाज वर्तवले जात आहेत. पावसाचे आणखी सव्वा दोन महिने बाकी असल्याने ही तूट भरून निघेल ही आशा करूया.! ***

# महाराष्ट्रातील चाणक्य : देवेंद्र फडणवीस



लोकसभा निवडणुकीत महायुतीपेक्षा जास्त मिळालेल्या यशामुळे महाआघाडीचे नेते हुरळून गेले आहेत. दोन महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाआघाडीची सत्ता येणार, अशी ते स्वप्ने रंगवू लागले आहेत; पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार हे काही कच्च्या गुरूंचे चेले नाहीत, याचेही भान महाआघाडीच्या काही नेत्यांना आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे किंवा नाना पटोले या आघाडीच्या नेत्यांना सर्वात जास्त धसका हा देवेंद्र फडणवीसांचा आहे. देवेंद्र आपल्या चाणक्यनीतीने कशी कुणावर मात करतील, याचा अंदाज व्यक्त करणे खूप कठीण आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांचे निवडणुकीतील टार्गेट हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असतील, हे सर्वांना कळून चुकले आहे. देवेंद्र यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. एक नागपूरचा तरूण आमदार विधानसभेत येतो आणि नंतर कधीच मागे वळून बघत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारात वाढलेले देवेंद्र हे भाजपाचे हाडाचे कार्यकर्ते आहेत. सामाजिक व आर्थिक परिवर्तनासाठी राजकारणाचा माध्यम म्हणून उपयोग केला पाहिजे, हे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे सूत्र आहे. शिक्षणाने एल. एल. बी, नंतर बिझनेस मॅनेजमेंटमधे पदवी, असे उच्च शिक्षण प्राप्त केलेल्या देवेंद्र यांची महाराष्ट्राच्या राजकारणात एक सुसंस्कृत चेहरा म्हणून ओळख आहे. 'केंद्रात नरेंद्र व महाराष्ट्रात देवेंद्र' अशी घोषणा सन २०१४ मध्ये पक्षात ऐकायला मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा आशीर्वाद लाभलेल्या देवेंद्र यांनी सत्तेच्या राजकारणात वावरताना अनेक चढ-उतार अनुभवले.

२०१४ ते २०१९ या काळात पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या देवेंद्र यांना २०१९ मध्ये उद्धव ठाकरे महाआघाडीचे मुख्यमंत्री झाल्यावर विधानसभेत विरोधी पक्षनेता म्हणून काम करण्याची पाळी आली. अडीच वर्षांनंतर घडलेल्या सत्तांतराच्या राजकारणात नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंडाचा झेंडा फडकवल्यावर ठाकरे सरकार कोसळले; पण पक्ष श्रेष्ठींच्या निर्णयामुळे मुख्यमंत्रीपदाचा मुगूट एकनाथ शिंदे यांच्या मस्तकावर चढवला गेला. देवेंद्र मुख्यमंत्री असताना त्यांच्या सरकारमधे एकनाथ शिंदे हे कॅबिनेट मंत्री होते, त्याच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये देवेंद्र गेली अडीच वर्षे उपमुख्यमंत्री म्हणून काम करीत आहेत. सरकारमध्ये नंबर २ पदावर काम करताना, त्यांनी मुख्यमंत्र्यांचा सन्मान व आदर कायम राखला. पक्ष नेतृत्वावर निष्ठा व मनाचा मोठेपणा हे फडणवीसांमधील दोन्ही गुणांचे दर्शन या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला घडले. शरद पवारांच्या नंतर दुसरा युवा मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची नोंद होते. ऑक्टोंबर २०१४ मध्ये देवेंद्र मुख्यमंत्री झाले, तेव्हा ते ४४ वर्षांचे होते. पाच वेळा आमदार झाले. वयाच्या २२व्या वर्षी नागपूर महापालिकचे महापौर झाले. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात देशातील सर्वोत्तम मुख्यमंत्री अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. देवेंद्र हे बुद्धिमान व अभ्यासू नेतृत्व आहे. उत्तम प्रशासक, कुशल संघटक व मुत्सद्दी राजकारणी आहेत. विकास प्रकल्पांना गती देण्याचे धाडस व कौशल्य त्यांच्याकडे आहे. मुंबईतील भूमिगत मेट्रो व नागपूर- मुंबई समृद्धी मार्ग हे त्यांचे ड्रीम प्रोजेक्ट. हे दोन्ही प्रकल्प वेगाने कार्यान्वित होण्यासाठी, ते सतर्क होते.

देवेंद्र आज सरकारमध्ये नंबर २ असले, तरी महाराष्ट्राच्या राजकारणात देवेंद्र यांच्यावर हल्लाबोल केल्याशिवाय विरोधकांचे पान हलत नाही. एकनाथ शिंदे व अजित पवार यांना सरकारमध्ये जो सन्मान व अधिकार मिळाला आहे, तो भाजपामुळे आहे. महाराष्ट्रात आजच्या घडीला विधानसभेत भाजपा हा सर्वात शक्तिमान पक्ष आहे आणि गेली दहा वर्षे भाजपाचा महाराष्ट्रातील चेहरा देवेंद्र फडणवीस हेच आहेत. भाजपाच्या श्रेष्ठींना महाराष्ट्रात जे करायचे आहे, ते देवेंद्र यांच्या मार्फत करून घेतात. श्रेष्ठींची भूमिका व मानसिकता काय आहे, हे देवेंद्र इतरांपेक्षा जास्त ओळखतात. गेल्या दहा वर्षांत राज्यात अन्य राजकीय पक्षांच्या तुलनेने भाजपाचा आलेख सतत उंचावत होता; पण २०२४च्या लोकसभा निवडणुकीने त्याला ब्रेक लागला. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाची घसरण झाली. २०१४ मध्ये एनडीएचे ४२ खासदार निवडून आले होते, २०१४ मधे ही संख्या १७ वर घसरली. २०१४ मध्ये भाजपाने २५ जागा लढवल्या होत्या व २२ खासदार निवडून आले होते. २०२४ मध्ये भाजपाने २८ जागा लढवल्या व केवळ ९ जागांवर विजय मिळाला. मतांमध्येही एक टक्का घट झाली. राज्यात ट्रीपल इंजिन सरकार असूनही व शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी पडूनही महायुतीला व भाजपाला अपयश आले. लोकसभा निकालानंतर फडणवीस आणि महायुतीचे अन्य नेते सावध झाले आहेत. लोकसभा निवडणुकीतील अपयशाची जबाबदारी आपण स्वत: स्वीकारत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी जाहीरपणे सांगितले व आपल्याला सरकारमधून मुक्त करावे, अशी त्यांनी विनंती श्रेष्ठींना केली. खरे तर पक्षाची कोअर कमिटी शक्तिमान असते. प्रदेशाध्यक्षपद हे निवडणुकीत मौल्यवान असते; पण पक्षातील अन्य कोणीही अपयशाची जबाबदारी स्वीकारत असल्याची हिंमत दाखवली नाही. पक्षाच्या पराभवाला केवळ देवेंद्र फडणवीस ही एकच व्यक्ती जबाबदार कशी, असा कोणीही प्रश्न उपस्थित केला नाही म्हणूनच अन्य नेत्यांपेक्षा देवेंद्र यांचे नेतृत्व वेगळे आहे, असे म्हणावे लागते.

नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत भाजपाचे पाच उमेदवार निवडून आले. खरं तर भाजपकडे एवढे संख्याबळ नसतानाही, सर्व पाच उमेदवार निवडून आणण्याचे, कसब देवेंद्र यांच्या चाणक्यनीतीने दाखवले. महायुतीचे एकूण नऊ जण निवडून आणताना शिंदे, फडणवीस-अजित पवार यांची एकजूट दिसली; पण त्याच वेळी शेका पक्षाचे जयंत पाटील यांचा पराभव झाल्याने, महाआघाडीतील विसंवाद उघड्यावर आला. विधान परिषदेतील यशाने फडणवीस हुरळून गेले नाहीत आणि लोकसभा निवडणुकीच्या निकालाने ते निराशही झाले नाहीत. लोकसभेतील पराभवाची जखम अजूनही ओलीच आहे. मात्र येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर त्यांनी आपले सारे लक्ष्य केंद्रित केले आहे. वाटेल ते करून राज्यात महायुतीची सत्ता पुन्हा आणण्याचा त्यांनी चंग बांधला आहे. महायुती सरकारकडे स्पष्ट बहुमत आहे. विधानसभेत १८० पेक्षा जास्त आमदार आहेत, तरीही लोकसभेत भाजपाची घसरण का झाली? यावर पक्षात आत्मचिंतन झाले. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर लोक शांत होते. महाराष्ट्रात झालेले सत्तांतर जनतेने स्वीकारले होते; पण अजित पवारांनी त्यांच्या काकांच्या विरोधात केलेल्या बंडानंतर त्यांना बरोबर घेण्याची भाजपाची गरज होती का, अशी चर्चा सुरू झाली.

२०१९च्या निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस हे मी पुन्हा येईल, असे वारंवार सांगत होते, मी पुन्हा येईन हा एक टिंगल टवाळीचा विषय बनला होता. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तोड-फोड झाल्यावर, मी दोन पक्ष फोडून पुन्हा आलो आहे, असे जेव्हा फडणवीस सांगू लागले, ते लोकांना फारसे रुचले नाही. अगोदरचे सरकार पाडणे, पक्ष फोडणे, मूळ पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह फुटीरांना मिळणे हे कदाचित शिंदे- अजित पवारांच्या मनासारखे झाले असेल; पण लोकांवर त्याचा काहीच परिणाम झालेला नाही, असे कसे म्हणता येईल? लोकसभा निवडणूक काळात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राज्यात १८ सभा झाल्या, तरीही भाजपाचे केवळ नऊच खासदार का निवडून आले, हा प्रश्न मती गुंग करणारा आहे. विधानसभा निवडणुकीची चाहुल लागली आहे.महायुतीतील सर्वांना विश्वासात घेऊन, देवेंद्र यांना रणनीती आखावी लागणार आहे. भाजपा हा सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आणणे, हे त्यांच्यापुढे मोठे आव्हान आहे. मुख्यमंत्र्यांची माझी लाडकी बहीण, लाडका भाऊ, वारकऱ्यांना पेन्शन, दिंडीला अनुदान, ज्येष्ठांना तीर्थयात्रा, सुशिक्षित तरुणांना स्टायपेंड असे महिला, तरुण व ज्येष्ठांना आकर्षित करणारे अनेक धाडसी निर्णय महायुती सरकारने घेतले असले, तरी त्याची अंमलबजावणी सोपी नाही. आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात गढूळ वातावरण निर्माण झाले आहे. एकमेकांचे वैरी आहेत, अशी भावना दोन समाजात रूजणे, हे अत्यंत घातक आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून कोणी वातावरण प्रक्षुब्ध करीत असतील, तर त्यांना शांत करणे, हा लाख मोलाचा मुद्दा आहे. पुरोगामी महाराष्ट्रात जातीवरून देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट केले जाणार असेल, तर ते मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

**- डॉ.सुकृत खांडेकर**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# परळी वैजनाथ ते परभणी रेल्वे रूळ दुहेरीकरणासाठी कोणाचेही राहते घर बाधित होऊ नये-ना.धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे यांची रेल्वेमंत्र्यांकडे थेट भेटून मागणी

मुंबई (बातमीदार):- परळी वैद्यनाथ ते परभणी रेल्वे रूळ दुहेरीकरण करण्यासाठी कुणाचाही विरोध नाही, मात्र यासाठी भूसंपादन करताना कुणाचेही राहते घर बाधित होऊ नये. त्यासाठी भूसंपादन करताना दक्षिण ऐवजी मूळ रुळाच्या उत्तर बाजूने भूसंपादन केले जावे तसेच भूसंपादन करण्यासाठी १९ जून रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले राजपत्र स्थगित करावे, अशी मागणी आज केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना समस्त परळीकरांच्या वतीने कृषिमंत्री धनंजय मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे केली आहे.



परळी-परभणी रेल्वे रूळ दुहेरीकरण संदर्भात सुमारे ३५० आक्षेप अर्ज दाखल झाले असून त्याबाबत निर्णय, परळी-बीड-नगर रेल्वे कामाला गती देणे यांसह बीड जिल्ह्यातील रेल्वे विषयक विविध मागण्यांच्या संदर्भात कृषिमंत्री धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे व शिष्टमंडळाने गुरुवारी सायंकाळी मुंबई येथे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन निवेदन सादर करत सविस्तर व सकारात्मक चर्चा केली. मंत्री श्री.अश्विनी वैष्णव यांनीही सर्व मागण्या समजून घेत त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

परळी-बीड-अहिल्यानगर (अहमदनगर) रेल्वे कामाला परळीच्या बाजूने देखील सुरुवात करण्यात यावी, परळी ते मुंबई स्वतंत्र एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी, लातूर एक्सप्रेस परळी पर्यंत वाढवण्यात यावी, नांदेड-पनवेल एक्सप्रेस प्रवाशांच्या व भाविकांच्या सोयीसाठी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पर्यंत वाढवण्यात यावी. घाटनांदूर मार्गाने जाणाऱ्या एक्सप्रेस गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा, घाटनांदूर परिसरातील राजा भैय्या पांडे यांच्या शेतातून जाणाऱ्या रेल्वे रुळासाठी अंडरपास द्यावा, चोपणवाडी उड्डाणपूल, परळी शहर बायपास, उड्डाणपूल, पादचारी मार्ग आदी ठिकाणी अंडरपास उभे करण्यात यावेत, यांसह बीड जिल्ह्यातील महत्वाच्या रेल्वे विषयक मागण्यांबाबत निवेदनासह सविस्तर चर्चा करण्यात आली. विकासाचे कार्य अविरत सुरू ठेवत जनतेच्या हितार्थ निर्णय घेणारे आपले सरकार असून, परळी वैद्यनाथ सह बीड जिल्ह्यातील रेल्वे विषयक मागण्यांच्या संदर्भात स्वतंत्र बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतले जातील, असा शब्द यावेळी केंद्रीय रेल्वे मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी शिष्टमंडळाला दिला. यावेळी शिष्टमंडळात ना.धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे, ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अय्युब खान पठाण, अजीज कच्छी, इस्माईल पटेल, शंकर आडेपवार, विजय भोयटे, केशव गायकवाड, अनंत इंगळे, दीपक तांदळे, अय्युब बागवान, गफार बागवान, इलियास बागवान, जावेद कुरेशी, रवी मुळे, शकील कच्छी, जाफर बागवान, अजीज पटेल, राजू शेख, महेंद्र रोडे, रेल्वे संघर्ष समितीचे जी.एस.सौंदळे गुरुजी यांसह आदी उपस्थित होते. कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना परळी स्थित पाचवे ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ प्रभुंच्या दर्शनाचे निमंत्रणही दिले आहे.

**रेल्वेमंत्र्यांनी दिला सविस्तर वेळ :-** रेल्वेमंत्री मुंबईत येणार हे समजताच परळीकरांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या या प्रश्नाच्या संदर्भात धनंजय मुंडे यांनी मुंबई येथे त्यांची वेळ घेतली. रेल्वेमंत्री हे पक्षाच्या एका बैठकीला आलेले असल्याने प्रचंड व्यस्त असतानाही धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांच्या आग्रहाखातर त्यांनी बैठकीतून व्यस्त वेळ काढून पक्षाच्या कार्यालयातच शिष्टमंडळासोबत चर्चा केली. यावेळी प्रस्तावित रेल्वे मार्ग, त्याचा नकाशा याची स्वतः प्रत्यक्ष पाहणी केली. धनंजय मुंडेंनी सादरीकरण करून परिस्थितीची जाणीव करून दिली.**

# 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना महिला सबलीकरणाचा मूलमंत्र

अत्यल्प आर्थिक गटामध्ये अनेक ठिकाणी शासकीय योजना जीवन जगण्याचे साधन आहे. संजय गांधी निराधार योजनेसारख्या अनेक योजनांमधून मिळणारा आर्थिक पुरवठा, जीवनावश्यक धान्य पुरवठा आणि अन्य सुविधांमुळे अनेकांचे जीवन ग्रामीण भागात सुसह्य झाले आहे. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असणाऱ्यांना या योजनांचे महत्त्व चांगलेच कळते. त्यामुळेच राज्य शासनाच्या नव्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेला ग्रामीण भागात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. ही योजना अत्यल्प आर्थिक गटातील गरीब, गरजू महिलांसाठीची आर्थिक क्रांती ठरणार आहे.



मुळात घरातली सर्व कामे करणे, ही महिलेची कर्तव्य समजणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये त्या कामाचे श्रममूल्य कधीच अधोरेखित झालेले नाही. त्यामुळे महिलेचे काम हे देखील श्रमाचे आणि कुटुंबाच्या अर्थार्जनात महत्त्वपूर्ण असल्याची जाणीव नसलेल्या समाजात महिला या आर्थिक स्वातंत्र्यापासून कायम वंचित राहिल्या आहे. अशा वंचित घटकासाठी या योजनेतून आर्थिक स्वातंत्र्याचा चंचू प्रवेश झाला आहे. आपले बँक अकाउंट, आपल्या अकाउंटमध्ये पैसे आवश्यकतेनुसार खर्च करण्याची मुभा, या योजनेची पुढील सामाजिक प्रबळ बाजू आहे.

महिला सबलीकरण धोरण ठरविणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. 'माझी कन्या भाग्यश्री', 'लेक लाडकी' या मुलींसाठी योजना सुरू केल्या. एवढ्यावरच न थांबता आता महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, त्यांच्या आरोग्य व पोषणात सुधारणा होण्यासोबतच कुटुंबात त्यांची निर्णायक भूमिका ठाम होण्यास मदत होणार आहे.

स्वतःचे बँक अकाउंट असणे, या अकाउंटमध्ये पैसे येणे आणि घरातील जुजबी खर्च करण्याची मुभा अप्रत्यक्षपणे मिळणे हा फार मोठा बदल दुर्गम ग्रामीण भागात या योजनेतून होणार आहे. कदाचित रक्कम छोटी असेल मात्र पुरुषाशिवाय कुठलेच काम न करू शकणाऱ्या महिलांच्या आयुष्यात या योजनेतून स्वावलंबनाचा, स्वाभिमानाचा आणि स्वनिर्णयाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.

**ऑफलाईन अर्जाने सुविधा :-** राज्य शासनाने या योजनेसाठी आता ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याचेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे ऑनलाईन म्हटल्यानंतर प्रश्नचिन्ह उभा राहणाऱ्या गृहिणींना आपला अर्ज सादर करणे आणखी सोपे झाले आहे. घरामध्ये कोणीही सुशिक्षित नसणाऱ्या कुटुंबांची संख्या ग्रामीण व दुर्गम भागात अधिक आहे. अशा ठिकाणी महसूल यंत्रणेची व जिल्हा परिषदेचे कर्मचारी महिलांसाठी मदतीचे ठरत आहेत. ऑनलाईन फोटो काढण्याची अटही काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे आपल्या फॉर्म वरील फोटो अपलोड होत आहे व त्याद्वारे देखील ओळख पटविली जात आहे.

**मासिक आर्थिक आधार महत्वाचा :-** महाराष्ट्राच्या मागास भागांमध्ये ही योजना क्रांतिकारी ठरणार आहे. अडीच लाखाचे उत्पन्न या योजनेची अट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे साधारणतः २० हजार रुपये महिन्याची मिळकत असणाऱ्या चार ते पाच जणांच्या कुटुंबाला यामुळे कसा आर्थिक आधार भेटणार हा विचार केला तर ही योजना क्रांतिकारी ठरते. थोडक्यात २० हजार रुपयांमध्ये आपला महिनाभराचा सर्व खर्च काढणाऱ्या कुटुंबातील चार ते पाच सदस्यांना दीड हजार रुपयांची मासिक मदत किती आवश्यक ठरू शकते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**प्रत्येक महिलेला मदत करूया :-** ग्रामीण, आदिवासी वस्त्यांमध्ये, पाड्यांवर दुर्गम गावांमध्ये आर्थिक क्रांती आणणारी ही योजना आहे. सर्वप्रथम या योजनेमुळे महिलांच्या आत्मविश्वासामध्ये वाढ होणार आहे. बँकेशी नाते जोडले जाणार आहे. अस्तित्वाला आर्थिक ताकत जोडली जाणार आहे. त्यामुळे शासनाच्या योजनेत गावातील तरुण व सुशिक्षित मुला-मुलींनी प्रत्येकाला हा लाभ मिळावा, यासाठी पुढे येणे आवश्यक आहे. गाव पातळीवर ग्रामसेवक ते अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न केले जातात. मात्र ही योजना एक लोक चळवळ बनवून तिला यशस्वी करण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**गैरसमज नको; शंका नको :-** योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. रक्षाबंधनापर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जुलै व ऑगस्ट महिन्याचे पैसे जमा केले जाणार आहे. संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यरत आहे. शहरातील वार्डामध्ये गावातील वाड्या-वस्त्यांमध्ये समित्या स्थापन झाल्या असून अर्ज भरून घेणे सुरू आहे. त्यामुळे ही योजना बंद पडेल का? या योजनेतून पैसे मिळणार नाहीत? किंवा कोणत्या अन्य अफवांवर जनतेने विश्वास ठेवू नये. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी व पालकमंत्र्यांनी या योजनेबद्दल जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. स्वतः जिल्हाधिकारी रोज या संदर्भातील कार्यवाहीचा आढावा ऑनलाईन पद्धतीने घेत आहेत. एका कुटुंबातील जास्तीतजास्त दोन महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. ज्या पात्र महिला स्वतः ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करू शकतात त्यांच्यासाठी 'नारी शक्ती दूत' हे मोबाईल ॲप्लिकेशन कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे तातडीने फॉर्म भरावा. कोणताही किंतु-परंतु मनात ठेवू नये, असे प्रशासनाचे आवाहन आहे.

**पिवळे व केशरी कार्डधारक लाभार्थी :-** या योजनेच्या आर्थिक निकषानुसार अडीच लाखाची वार्षिक आर्थिक मर्यादा ठेवण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे पिवळी व केशरी शिधापत्रिका आहे ते फक्त आधार कार्ड, आपला पासपोर्ट फोटो आणि केशरी किंवा पिवळ्या शिधापत्रिकेच्या पहिल्या व शेवटच्या पानाच्या झेरॉक्स इतक्या कागदपत्राच्या आधारे योजनेचे लाभार्थी ठरतात. त्यामुळे त्यांना अधिकच्या कोणत्याही कागदपत्राची गरज नाही. ज्यांच्याकडे शिधापत्रिका नसेल त्यांनी उत्पन्नाचा दाखला काढणे गरजेचे आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये ज्यांच्याकडे हे शिधापत्रिका कार्ड आहेत ते सर्व या योजनेत लाभार्थी ठरणार आहेत त्यामुळे त्या सर्वांनी १५००/- रुपये आपला महिना निश्चित करण्यासाठी जवळच्या सेतू केंद्रात किंवा अंगणवाडी सेविकेची मदत घ्यावी.

एकूणच ग्रामीण भागातील महिलांसाठी, अत्यल्प आर्थिक गटासाठी, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' आर्थिक स्वातंत्र्याचा क्रांतिकारी निर्णय असून यामध्ये आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक भगिनी सहभागी होईल, याकडे गावातील सरपंचापासून तर सर्वच उन्नत गटातील सुशिक्षितांनी लक्ष वेधणे आवश्यक आहे.

**थोडक्यात योजना**

योजनेचे नाव : 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'
आर्थिक अट : अडीच लाखांपेक्षा कमी असावे
तरतूद काय : दीड हजार महिना ; १८ हजार वर्षाला
पक्के लाभार्थी : पिवळी व केशरी शिधापत्रिकाधारक
अंतिम मुदत : ३१ ऑगस्ट २०२४
प्रमुख कागदपत्रे : आधार कार्ड, बँक अकाउंट, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला.

**- प्रवीण टाके,**
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड